स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवीसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा सारांश आराखडा.

A SYNOPSIS

संशोधनाचा विषय

''लातूर जिल्ह्यातील मुस्लीम समाजाच्या आर्थिक व सामाजिक बदलांचा चिकित्सक अभ्यास'
(कालखंड - २००१ ते २०११)

संशोधक

शेख सुरज चाँदपाशा

एम.ए. एम. फिल, बी.एड.

मु.पो.लातूर. ता.जि. लातूर.

मो. ९९२३९०९८५६

e-mail- surajshaikh387@gmail.com

संशोधन मार्गदर्शक

प्रा. डॉ. मनोजकुमार यादवराव सोमवंशी

अर्थशास्त्र विभागप्रमुख व संशोधन मार्गदर्शक

शिवनेरी महाविद्यालय, शिरुर अनंतपाळ,

ता. शिरुर अनंतपाळ, जि. लातूर

पिन -४१३५४४ मो.९८८१४३३०७६

e-mail- dr.manojkumar713@gmail.com

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्रे संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

फेब्रुवारी २०१६

प्रस्तावना (Introduction) :

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. अनेक धर्म, अनेक भाषा व वेगवेगळ्या संस्कृतीचा सुंदर मिलाप हे भारतीय उपखंडाचे खास वैशिष्ट्य आहे. उपखंडात एकच संस्कृती विविध भाषा, विविध संस्कृती, कृषीप्रधान अर्थव्यवस्था, लाखो खेड्यांची रचना पाहावयास मिळते व या देशात विविध समुदायाचे लोक एकत्र वास्तव्य करतात.

स्वातंत्र्योत्तर काळात सरकारने कल्याणकारी राज्यांची संकल्पना स्वीकारल्याने देशातील मानवसंसाधनाच्या विकासावर भर देण्यात येत आहे. विकास ही प्रक्रिया निरंतर चालत आली आहे. कोणत्याही देशात आर्थिक विकास व मानवी विकास एकाच वेळी होणे अभिप्रेत आहे. विकासाची मुलतत्वे समजून घेण्यासाठी बदल, वाढ व विकास यासंकल्पना आवश्यक आहे. बदल ही सहज प्रवृत्ती आहे. वाढ या संकल्पनेत बदल समाविष्ट असतो व तिला दिशा असते. बदल व वाढ यांच्यामुळे विकास होतो. वाढीच्या अवस्थेनंतर विकासाची अवस्था येते. विकास ही निरंतर, प्रागतिक आणि सर्वसमावेशक प्रक्रिया आहे. मानव समाजाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, कायदेविषयक संस्थांची संरचना वेगवेगळ्या प्रकारातील तंत्रज्ञान, पर्यावरण, कला आणि संस्कृती इ. घटकांचा आर्थिक विकासात सहभाग होतो. सर्व प्रकारच्या विकासात मानव हा केंद्रबिंदू असतो. जीवनमानाचा दर्जा उंचावणे हाच मुख्य हेतू प्रत्येक देशाचा व आर्थिक विकासाचा असतो. त्याचबरोबर अल्पसंख्यांक लोकांचा जीवनमानाचा दर्जा उंचावणे हा हेतू असतो.

लोकसंख्या हा सजीव सृष्टीतील सर्वांत महत्वपूर्ण घटक असून तो पृथ्वीवर वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळ्या वंशात व वेगवेगळ्या धर्मातील जातीपातींत विभाजित झाला आहे. त्यात ख्रिश्चन, मुस्लीम, बौध्द, हिंदू, जैन, पारशी इ. तर काही धर्माला न मानणाऱ्या लोकांचेही अस्तित्व आहे. जगामध्ये लोकसंख्येच्या आकड्याने सर्वांत मोठा समुदाय ख्रिश्चन असून दुसऱ्या स्थानावर मुस्लीम समुदायाचे लोक वास्तव्य करतात. त्यामध्ये ख्रिश्नच लोकसंख्या 33.35 टक्के असून मुस्लीम समुदायाची लोकसंख्या 22.43 टक्के आहे. जगातील आशिया, अफ्रिका या खंडांत मुस्लीम लोकसंख्या अधिक प्रमाणात असून अन्य खंडांतील लोकसंख्या अल्प प्रमाणात वास्तव्य करते.

भारत हे विविध जातीधर्मांचे वास्तव्य असणारे राष्ट्र असून या राष्ट्रात हिंदू धर्मियांनतर मुस्लिम समुदायाची लोकसंख्या लाक्षणिक आहे. मात्र ही देशाच्या सर्व भागात वास्तव्य करते. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी भारत पाकिस्तान फाळणी होवून मुस्लिम समुदयाची लोकसंख्या पाकिस्तान या राष्ट्रामध्ये अधिक प्रमाणात राहिली. मात्र आजही भारतात मुस्लीम समाजाचे लोक मोठ्या प्रमाणात असून ते देशाच्या सर्व प्रदेशात मोठ्या संख्येने विविध व्यवसायात गुंतलेले आहेत. त्यात जम्मू काश्मीर, प. बंगाल, केरळ, आसाम, महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा या राज्यात मुस्लीम समुदाय अधिक प्रमाणात आहे. प्रादेशिक पातळीवर व्यवसायाचे स्वरुप वेगवेगळे आहे.

महाराष्ट्र हे लोकसंख्येने देशातील दुसऱ्या क्रमांकाचे राज्य असून या राज्यात मुस्लीम समाजाची लोकसंख्या अधिक प्रमाणात आहे. मात्र लोकसंख्येच्या तुलनेत मुस्लीम समाजाकडे आर्थिक व सामाजिक विकासात शासनाचे दुर्लक्ष झालेले आहे. त्यात मुस्लीम समाजाचा शिक्षणाकडे

बघण्याचा दृष्टिकोन कमी व व्यवसायिक दृष्टीकोन अधिक असल्यामुळे हा समाज आर्थिक व सामाजिकदृष्ट्या आर्थिक प्रगतीपासून दूर आहे.

जागतिक लोकसंख्येचा व तज्ज्ञांच्या अनुमानानुसार 20 ते 30 लाख वर्षांपूर्वी मानवाचा उगम झाला असावा. 1830 मध्ये जगातील एकूण लोकसंख्या 100 कोटी होती. पुढील 100 वर्षांत ती दुप्पट म्हणजे 200 कोटी झाली. पुढील काही वर्षांत लोकसंख्या वाढीचा दर वाढत गेला. अगदी अलीकडे 1960 मध्ये या लोकसंख्येने 300 कोटीचा आकडा पार केला. पुढे 15 वर्षातच 1975 मध्ये ती 400 कोटीपर्यंत पोहोचली. 11 जुलै 1987 मध्ये जगाची लोकसंख्या युगोस्लोव्हाकिया देशातील बालकाच्या जन्मासह जगाची लोकसंख्या 500 कोटी झाली. म्हणून '11 जुलै' हा दिन संपूर्ण जगभर 'लोकसंख्या दिन' म्हणून साजरा केला जातो. पुढे 12 ऑक्टोबर 1999 ला जगाची लोकसंख्या 600 कोटींवर पोहोचली. युनोच्या 'वर्ड पॉप्युलेशन प्रोटेस्टस-2012' नुसार जगाची लोकसंख्या 7.2 अब्ज झाली.

महाराष्ट्र हे देशातील एक विकसित व संपन्न राज्य असून या राज्यात विविध धमाचे, वर्गाचे जातींचे लोक वास्तव्य करतात. महाराष्ट्र हे देशातील 29 घटकराज्य व केंद्रशासित प्रदेशांपैकी एक राज्य असून त्यात 36 जिल्ह्यांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील 36 जिल्ह्यांपैकी लातूर हा एक जिल्हा असून या जिल्ह्याची निर्मिती 16 ऑगस्ट 1982 ला झाली. या जिल्ह्यात विविध जातीधर्मांचे लोक मोठ्या प्रमाणत राहत असून मुस्लीम समुदायाची लोकसंख्या ही जिल्ह्यतील 10 तालुक्यांमध्ये वितरीत झाली आहे.

महाराष्ट्रात मराठवाडा या प्रादेशिक विभागातील लातूर हा एक जिल्हा असून या जिल्ह्यात 10 तालुक्यांचा समावेश आहे. या जिल्ह्यात नैसर्गिक साधन संपत्तीचा मोठा अभाव असून लोकसंख्येचे वितरण ग्रामीण व शहरी भागात कमी अधिक प्रमाणात झालेले आहे. लातूर जिल्ह्यातील 10 तालुक्यांमध्ये मुस्लीम समाजाच्या लोकसंख्येचे प्रमाण अधिक प्रमाणात आहे. ग्रामीण व शहरी भागाचा विचार केला तर ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात मुस्लीम समाजाचे लोक अधिक प्रमाणात राहत असून व्यावसायाच्या शोधात ग्रामीण भागाकडून शहरी भागाकडे मुस्लीम लोकसंख्येचे स्थलांतर झाले आहे. शहरी भागात हा समाज लघु, मध्यम व काही प्रमाणात मोठ्या व्यवसायात गुंतला असून या समाजाची आर्थिक स्थिती व्यवसायावरच अवलंबून आहे. त्यात प्रामुख्याने बांधकाम व्यवसाय, फळविक्री व्यवसाय, भाजीविक्री, मांसविक्री, छोट्या प्रमाणात कपड्यांचा व्यवसाय व मजूरी व्यवसायावर कुटुंबाची आर्थिक परिस्थीती अवलंबून आहे.

संशोधन विषयाची निवड (Choice of Subject) :

आज जगामध्ये अनेक देशात तीव्र प्रकारच्या समस्या आहेत. त्यात आर्थिक विषमता, दारिद्रय, बेरोजगारी उपासमार, वाढती लोकसंख्या या समस्या अधिक तीव्रतेने जाणवतात. भारतासारख्या विकसनशील देशात अशा समस्यांनी तीव्र रूप धारण केले आहे. भारतासारख्या देशात मुस्लीम समाजाची लोकसंख्या लाक्षणिक असताना हा समाज विकासापासून वंचित आहे. त्यांची आर्थिक व

सामाजिक स्थिती खालावत चालली आहे. यासाठी त्यांना आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत आणण्यासाठी योग्य नियोजनाची गरज आहे. या हेतूने प्रस्तुत संशोधन करणे आवश्यक वाटते.

संशोधनाची गरज व महत्व (Need and Importance of Research) :

देशात उपलब्ध असलेल्या साधन सामग्रीचे वितरण असमान प्रमाणात झालेले आहे. त्यामुळे समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत योग्य प्रमाणात वितरण झालेले नाही. त्यामुळे गरीब गरीब होत आहे तर श्रीमंत श्रीमंत होत आहे. श्रीमंताकडे गरजेपेक्षा जास्तीची संपत्ती वाढत आहे. देशातील राष्ट्रीय उत्पन्नाचे सर्व समाज घटकामध्ये न्याय्य पध्दतीने वितरण होणे आवश्यक असते. त्यातून सामाजिक व आर्थिक न्याय्य प्रस्थापित होतो. मात्र वास्तव परिस्थीती वेगळी वाटते म्हणून प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडणे गरज वाटते.

बदलत्या सामाजिक परिस्थितीती मुस्लीम समाजासारख्या अल्पसंख्यांक समाजाचे आर्थिक विश्लेषणात्मक व तुलनात्मक अध्ययन होणे ही काळाची गरज आहे.

संशोधनाची व्याप्ती (Scope of Study) :

प्रस्तुत संशोधन हे मराठवाड्यातील लातूर जिल्ह्यातील मुस्लीम समाजाच्या आर्थिक व सामाजिक बदलांशी निगडीत आहे यासाठी निवडण्यात आलेला कालखंड हा 2001 ते 2011 हे दशक आहे.

संशोधनाचे भौगोलिक क्षेत्र :

प्रस्तुत संशोधनासाठी लातूर जिल्हा हे भौगोलिक क्षेत्र म्हणून निवडण्यात आले आहे.

मराठवाड्यातील लातूर या जिल्ह्यातील मुस्लीम समुदायाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यासाचे दशक 2001 ते 2011 असे राहील.

संशोधनाचा कालखंड (Period of Study):

प्रस्तुत संशोधनासाठी निवडण्यात आलेला कालखंड 2001 ते 2011 या दशकापुरता (म्हणजेच 10 वर्षापुरता) मर्यादित राहील.

सदरील संशोधन हे विद्यापीठाने निर्धारित केलेल्या कालावधीत पूर्ण करण्यात येईल.

संशोधनाची उद्दिष्टे (Aims & obectives of the research) :

1. लातूर जिल्ह्यातील मुस्लीम समुदायाच्या आर्थिक व सामाजिक बदलांचा अभ्यास करणे.
2. लातूर जिल्ह्यातील मुस्लीम समाजाच्या विविध व्यवसायांचा अभ्यास करणे.
3. लातूर जिल्ह्यातील मुस्लीम समाजाच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी सरकारी योजनांचा आढावा घेणे.
4. मुस्लीम समाजाच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक समस्याला कारणीभूत असणाऱ्या घटकांचे अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून विश्लेषण करणे.
5. मुस्लीम समाजाच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी विविध उपाययोजना सुचविणे.
6. लातूर जिल्ह्यातील मुस्लीम समाजाच्या विविध व्यवसायात कार्यरत असलेल्या कुटुंबाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन करणे.

संशोधनाची गृहीतके (Hypothesis) :

1. लातूर जिल्ह्यातील मुस्लीम समाजाची आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक स्थिती मागासलेली आहे व मागासलेपणाची तीव्रता वाढत चालली आहे.
2. शासनाने मुस्लीम समाजाच्या प्रगतीसाठी केलेले उपाय मर्यादित स्वरुपाचे आहेत.
3. मुस्लिम समाजाच्या आर्थिक विकासासाठी योग्य तरतूद नसल्याने त्यांचे सामाजिक व आर्थिक तीव्र परिणाम पहावयास मिळतात.
4. मुस्लीम समाजाच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीवर नैसर्गिक आपत्ती व राजकीय स्थितीचा प्रभाव दिसून येतो.
5. लातूर जिल्ह्यात मुस्लीम समाजात व्यवसायिक विविधता आहे. त्यामुळे समाजात आर्थिक विषमता दिसून येते.

संशोधन पध्दती (Research Methodology) :

प्रस्तुत संशोधन प्राथमिक माहिती संकलनासाठी लातूर जिल्ह्यातील एकूण 10 तालुक्यांची व प्रत्येक तालुक्यात 5 गावांची व प्रत्येक गावातील 6 कुटुंबाची अशी एकूण 10 तालुके, 50 गावे, व 300 मुस्लीम कुटुंबाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीशी निगडीत माहितीचे प्रश्नावलीद्वारे संकलन करण्यात येईल व विश्लेषण, तुलना याद्वारे नमुना पध्दतीने निष्कर्ष काढले जातील.

द्वितीयक सामग्रीची साधने :

द्वितीय साधन सामग्रीमध्ये मराठवाडा, महाराष्ट्र, जिल्हा जनगणना, सवेक्षण डायरी, अपेक्षित ठिकाणी भेटी, पोस्ट, टेलिफोन, मोबाईल, सरकारचे अहवाल, फोटोग्राफी, नकाशे, पुस्तके, मासिके, जनगणना अहवाल, वृत्तपत्रे, सरकारी कार्यालयाचे विविधअहवाल व शासनामार्फत स्थापन करण्यात आलेल्या विविध समित्यांचे अहवाल, प्रबंध व वार्षिक अहवाल, इंटरनेट व जिल्हा जनगणना अहवाल इत्यादी साधनांचा आधार घेवून संशोधन पूर्ण केले जाणार आहे.

संशोधनाच्या मर्यादा (Limitations of Study):

संशोधनासंबंधी माहिती मिळवण्यासाठी पुढील काही मर्यादा येवू शकतात.

1. सदरील संशोधन लातूर जिल्ह्यापुरतेच मर्यादित राहिल.
2. संबंधित संशोधनात फक्त मुस्लीम समाजाशी निगडीत आहे.
3. मुस्लीम समाजातील बरीच कुटुंबे ही निरक्षर असण्याची शक्यता आहे. त्यामुळे योग्य आकडेवारी त्यांच्याकडून मिळू शकेलच असे नाही.
4. प्रस्तुत संशोधनाचा कालावधी 10 वर्षांसाठीच आहे.

प्रकरण विभागणी (Chapterisation) :

संबंधित विषयाचे संशोधन करताना योग्य, सुसंगत असे संशोधन व्हावे. प्रत्येक घटकाचा सखोल विचार करता यावा म्हणून संशोधन विषयाची विभागणी खालील प्रकरणांमध्ये करण्यात आली आहे.

प्रकरण 1 ले - प्रस्तावना व मुस्लीम समाजाची पार्श्वभूमी

प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाच्या अनुषंगाने मुस्लीम समाजाची पार्श्वभूमी, इतिहास, व जीवनपध्दतीचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण 2 रे - संशोधन पध्दती व संदर्भ साहित्याचे सिंहावलोकन

प्रस्तुत प्रकरणात संशोधनासाठी उपलब्ध साहित्याचे सिंहावलोकन करण्यात येईल. त्यासाठी प्राथमिक व द्वितीयक सामुग्री संग्रहण, विश्लेषण व तुलना करण्यात येईल.

प्रकरण 3 रे - लातूर जिल्ह्याची ओळख व सद्यस्थिती

लातूर जिल्ह्याचा पूर्व इतिहास, निर्मिती, भागौलिक परिस्थिती, लोकसंख्येचे वितरण, तालुकानिहाय वितरण, आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, पर्यावरणीय संरचनेचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण 4 थे - लातूर जिल्ह्यातील मुस्लीम समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थिती

प्रस्तुत प्रकरणात लातूर जिल्ह्यातील मुस्लीम समाजाच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणे अपेक्षित आहे. लातूर जिल्ह्यातील मुस्लीम समाजाचे स्थान, विस्तार, व्यवसायिक रचना, राहणीमानाचा दर्जा, दारिद्रय, बेरोजगारी यांचा विश्लेषणात्मक व तुलनात्मक आढावा घेतला जाईल.

प्रकरण 5 वे - मुस्लीम समाजाच्या विकासासाठी विविध उपाययोजना

प्रस्तुत प्रकरणात मुस्लीम समाजाच्या विकासासाठी विविध योजिलेल्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण 6 वे - निष्कर्ष, शिफारशी व सारांश

प्रस्तुत संशोधनातून शेवटी निष्कर्ष व शिफारशी काढल्या जातील व उपाययोजना करण्यात येतील.

संदर्भ सूची

1. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2012-2013 महाराष्ट्र राज्य अर्थ आणि सांख्यिकी संचनालय, मुंबई 2012-2013.
2. डॉ. जे.सी. पंत, जननांकिक (हिन्दी), विशाल पब्लिकेशन हाऊस, जालंधर, पंजाब.
3. प्रतियोगिता दर्पण, भारतीय अर्थव्यवस्था, उपकार प्रकाशन, दिल्ली.
4. जिल्हा सामाजिक आणि आर्थिक समालोचन 2007 -08.
5. भारत वार्षिकी पुस्तिका - 2014, 2015, 2016.
6. जस्टिस राजेंद्र सच्चर समिती अहवाल -2005.
7. भारतीय अर्थव्यवस्था - कै. देसाई व डॉ. सौ. निर्मल भालेराव, निराली प्रकाशन, पुणे जुलै 2015
8. भारतीय अर्थव्यवस्था - दत्त व सुंदरम, एस.चांद प्रकाशन, नवी दिल्ली, 2012.
9. भारत -2016 - प्रकाशन विभाग, सूचना और प्रसारण मंत्रालय, भारत सरकार.

संशोधक विद्यार्थी

श्री. शेख सुरज चाँदपाशाप्रा
एम.ए. एम. फिल, बी.एड. लातूर.
मो. ९९२३९०९८५६

मार्गदर्शक

डॉ. मनोजकुमार यादवराव सोमवंशी
अर्थशास्त्र विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक
शिवनेरी महाविद्यालय, शिरुर अनंतपाळ,
ता. शिरुर अनंतपाळ, जि. लातूर